महाराष्ट्र शासन

पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक ०२/०९/२०२४

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.आयएसए-०८२४/प्र.क्र.३१५/विशा-४ दिनांक ३० ऑगस्ट, २०२४.

**विषय :-** दहशतवाद विरोधी पथकातील पोलीस उप निरीक्षक व सहायक पोलीस निरीक्षक यांच्या एकूण मंजूर पदे (७९+६५=१४४) या पद संख्येच्या मर्यादेत राहून आवश्यकतेप्रमाणे व उपलब्धतेप्रमाणे रिक्त पदे पोलीस उप निरीक्षक व सहायक पोलीस निरीक्षक या संवर्गातून अतर्गत बदलीने/पदोन्नतीने भरण्यास मान्यता देणेबाबत

******

**परिपत्रक -**

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र. आयएसए-०८२४/प्र.क्र.३१५/विशा-४ दिनांक ३० ऑगस्ट, २०२४. ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२४०८३०१६४८३३१८२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )

पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था / प्रशिक्षण व खास पथके / आस्थापना /प्रशासन नियोजन व समन्वय /विशेष कृती /रा.रा.पो.बल /वाहतूक / फोर्स वन /आर्थिक गुन्हे / दहशतवाद विरोधी पथक/ लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.

अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.

अपर पोलीस महासंचालक, व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.

पोलीस महासंचालक यांचे वरिष्ठ उपसहायक (आस्थापना-२)

कार्यासन अधिकारी, का.क्र.४ ,५

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

2./- पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "आस्थापना" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

**दहशतवाद विरोधी पथकातील पोलीस उप निरीक्षक व सहायक पोलीस निरीक्षक यांच्या एकूण मंजूर पदे (७९+६५=१४४) या पद संख्येच्या मर्यादेत राहून आवश्यकतेप्रमाणे व उपलब्धतेप्रमाणे रिक्त पदे पोलीस उप निरीक्षक व सहायक पोलीस निरीक्षक या संवर्गातून अंतर्गत बदलीने / पदोन्नतीने भरण्यास मान्यता देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**गृह विभाग**

**शासन निर्णय क्रमांक :- आयएसए-०८२४/प्र.क्र.३१५/विशा-४**

दुसरा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक:- ३० ऑगस्ट, २०२४.

**वाचा:-** १. गृह विभाग,शासन निर्णय क्र.एसएसए-१००३/१५/विशा-४, दि.०२.०७.२००४

२. गृह विभाग, शासन निर्णय क्र.आयएसएस-१२१७/प्र.क्र.६८०/विशा-४ दि.१५.१०.२०१८

३. अपर पोलीस महासंचालक (आस्थापना), पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय, यांचे दिनांक २२.०८.२०२४ चे पत्र सहपत्रांसह.

**प्रस्तावना:-** शासन निर्णय दिनांक ०२.०७.२००४ अन्वये संपूर्ण महाराष्ट्रासाठी दहशतवाद विरोधी पथकाची स्थापना करण्यात आलेली आहे. पोलीस उप निरीक्षक व सहायक पोलीस निरीक्षक यांना दहशतवाद विरोधी पथकात दहशतवादी गुन्ह्याचा तपास करणे, त्या अनुषंगाने विविध गुप्तचर यंत्रणाकडुन दहशतवादी हल्यांशी संबंधित वेळोवेळी प्राप्त होणारे गोपनीय इशारे यांची खातरजमा करणे, गोपनिय अभियान राबविणे अशी कर्तव्य या घटकात पार पाडावी लागतात.

२. संदर्भ क्र.२ येथील गृह विभागाच्या दिनांक १५ ऑक्टोबर,२०१८ च्या शासन निर्णयान्वये दहशतवाद विरोधी पथकाच्या अभियानाची कार्यप्रणाली तसेच एंकदर कार्यक्षमतेवर विपरीत परिणाम होऊ नये याकरीता विशेष बाब म्हणून दहशतवाद विरोधी पथकातील पोलीस उप निरीक्षक व सहायक पोलीस निरीक्षक यांच्या एकुण मंजूर पदे (७९+६५=१४४) या पद संख्येच्या मर्यादेत राहून आवश्यकतेप्रमाणे व उपलब्धतेप्रमाणे रिक्त पदे पोलीस उप निरीक्षक व सहायक पोलीस निरीक्षक या संवर्गातून भरण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच सदर बदल करण्याचे अधिकार अपर मुख्य सचिव (गृह), यांना प्रदान करण्यात आले आहेत.

३. संदर्भ क्र.३ येथील दिनांक २२.०८.२०२४ च्या पत्रान्वये पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांच्या कार्यालयाने केलेल्या विनंतीनुसार दहशतवाद विरोधी पथकातील पोलीस उप निरीक्षक व सहायक पोलीस निरीक्षक यांच्या एकत्रित रिक्त पदांचा विचार करता व दहशतवाद विरोधी पथकाच्या कार्यप्रणाली तसेच एकंदर कार्यक्षमतेवर विपरीत परिणाम होऊ नये याकरिता विशेष बाब म्हणून पोलीस उप निरीक्षकांच्या एकुण ३३ रिक्त पदांवर (सहायक पोलीस निरीक्षक व पोलीस उप निरीक्षक यांच्या रिक्त पदांवर) एकुण १९ सहायक पोलीस निरीक्षकांना एकुण मंजूर पदसंख्येच्या (७९-पोउनि +६५-सपोनि=१४४) मर्यादेत राहून बदलीने / पदोन्नतीने भरण्यास विशेष बाब म्हणून मंजूरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याअनुषंगाने शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय:-**

दहशतवाद विरोधी पथकाच्या कार्यप्रणाली तसेच एकंदर कार्यक्षमतेवर विपरीत परिणाम होऊ नये याकरिता १९ सहायक पोलीस निरीक्षक यांना विशेष बाब म्हणून सहायक पोलीस निरीक्षक व पोलीस उप निरीक्षक यांच्या एकूण ३३ रिक्त पदांवर मंजूर पदसंख्येच्या (७९ पोउनि + ६५ सपोनि = १४४) मर्यादेत राहून अंतर्गत बदलीने / पदोन्नतीने सामावून घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर पदांवर होणारा खर्च पूर्वीप्रमाणेच "मुख्यलेखाशिर्ष २०५५ पोलीस १०९-गुन्हे अन्वेषन व दक्षता, १०१ (००) (०५) दहशतवाद विरोधी पथक, (२०५५ ०५७१) (योजनेत्तर/दत्तमत) ०१-वेतन" या उद्दिष्टाखाली मंजूर अनुदानातुन करण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४०८३०१६४८३३१८२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

PRAVIN SAHEBRAO DHIKALE

Digitally signed by PRAVIN SAHEBRAO DHIKALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=6d1bb8a730bc70c2cbcd0b01bab78ae17bc671feb580bcbbcd692fb0650b8855, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C5958E733FEF41BD5DDD91B20A6E0AC739E081BB933D0189686449BE15147182, cn=PRAVIN SAHEBRAO DHIKALE
Date: 2024.08.30 16:49:37 +05'30'

**( डॉ. प्रविण सा. ढिकले )**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. पोलीस आयुक्त, मुंबई.
३. सर्व अप्पर पोलीस महासंचालक.
४. अपर पोलीस महासंचालक, दहशतवाद विरोधी पथक,
५. महालेखापाल, महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई.
६. महालेखापाल, महाराष्ट्र (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई.
७. महालेखापाल, नागपूर (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर.
८. महालेखापाल, नागपूर (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर.
९. अधिदान व लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई/ नागपूर.
१०. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/नागपूर.
११. निवासी लेखापरीक्षा, मुंबई/नागपूर.
१२. वित्त विभाग (व्यय-७), मंत्रालय, मुंबई.
१३. गृह विभाग, कार्यासन बीयुडी-१, पोल-३, मंत्रालय, मुंबई.
१४. निवडनस्ती/विशा-४, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.